ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I ISSUE-VI Nov. 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

Vol - I | Issue - VI | November | 2014 | Monthly | ISSN 2349-638X

# शैक्षणिक संशोधनातील नाविन्यता आणि प्रतिसादकाचे हक्क

( Innovation in Educational Research and Right of Subjaects)

**श्रीमती पाटील मेघा श्रीकांत**

**संशोधक विद्यार्थीनी**

**शिक्षणशास्त्र अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ,**

**कोल्हापूर(महाराष्ट्र)—४१६००४**

**श्री.पवार संदिप अप्पाराव**

**सहायक प्राध्यापक**

**अशोकराव माने कॉलेज ऑफ एज्युकेशन (एम.एड.)**

**पेठ वडगांव,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर**

स्व—निश्चय,स्व—निर्णय,समान संधी ,खाजगी आयुष्याचे संरक्षण,व्यक्तिगत आदर, निष्कर्षाची माहिती जाणणे,ताण,इजा व धोक्यापासून संरक्षण,गोपनीयता व विश्वसनीयता असे प्रतिसादकांचे हक्क आहेत.शैक्षणिक संशोधनात नाविन्यता आणताना प्रतिसादकांचे हे हक्क अबाधित राखून संशोधन केल्यास निष्कर्षाची विश्वासार्हता वाढून प्रतिसादक उत्स्फूर्तपणे संशोधन कार्यात सहभागी होऊ शकतो. प्रतिसादकांच्या या हक्कांचे संरक्षण करून संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी संशोधकाने प्रतिसादकांची पूर्वपरवानगी घेणे,त्यांच्या वेळ,श्रम,पैशाची कदर करणे ,प्रायोगिक मात्रेचे समान वाटप,निष्कर्षाची माहिती देणे,निष्कर्षाचा उल्लेख गट सांख्यिकीच्या रूपात करणे असे उपाय केल्यास शैक्षणिक संशोधनाची आचार संहिता पाळकली जाईल आणि संशोधक अनैतिक आचरणापासून दूर राहील.

Keywords: शैक्षणिक संशोधन,नाविन्यता,प्रतिसादक हक्क

## प्रस्तावना

शैक्षणिक संशोधनामध्ये संशोधकाची आवड,मार्गदर्शकांची सवड आणि विषयाची निवड हे सुसूत्र अत्यंत महत्वाचे आहे. संशोधनाचे बरेचसे अव्वलपण हे विषयांच्या निवडीत असते. विषय निवडण्याच्या कसाटीमध्ये संशोधकाची योग्यता,लागणारा कालावधी व खर्च,नमुन्याकडून मिळणारे अपेक्षित सहकार्य या सर्वांबरोबरच नमुन्यातील प्रकितसादकांचाही विचार महत्वाचा आहे.संशोधनाचे एक नीतिशास्त्र असते.संशोधनात नाविन्यता आणताना प्रतिसादकांना कोणत्याही प्रकारची शारीरिक व नानसिक हानी पोहाचू नये हा संशोधनातील नीतिशास्त्राचा प्रमुख नियम आहे.यादृष्टीने संशोधनाच्या नीतिशास्त्रामध्ये प्रतिसादकांचा हक्क हा मुख्य घटक आहे.

## शैक्षणिक संशोधनातील प्रतिसादकांचे हक्क

अमेरिकन सायकॉलॉजिकल असोसिएशन (APA) आणि अमेरिकन एज्युकेशनल रिसर्च असोसिएशन (AERA )यांच्या संशोधनविषयक नियमावली (Code of Ethics) नुसार शैक्षणिक संशोधनातील प्रतिसादकांचे पुढील प्रमाणे हक्क आहेत.

**१..स्व–निश्चय** (Self Determinaation)

प्रतिसादकास संशोधनात सहभागी होण्याबाबत पूर्णत:स्वातंत्र्य असते.संशोधकाची जबरदस्ती नसते.स्वत:बद्लची माहिती द्यायची की नाही हे प्रतिसादक स्व निश्चयाने ठरवतो.

**२.स्व–निर्णय** (Informed Consent)

संशोधनाचा विषय,तिची उद्दिष्टे ,मर्यादा,गरज,महत्व,त्याला लागणारा वेळ,येणारे संभाव्य धोके,आपली नेमकी भुमिका काय असणार,स्वत:ला होणारे फायदे,तोटे या सर्व बाबी संशोधकांकडुन जाणून घेवून संशोधनात सहभागी होण्याचा किंवा न होण्याचा निर्णय प्रतिसादक स्वत: घेऊ शकतो.संशोधक प्रतिसादकाला निर्णय घेण्याची सक्त करू शकत नाही.

**३.समान संधी** (Equal Opportunity)

प्रतिसादक हा पुरूष असो वा स्त्री,गरीब असो वा श्रीमंत,हुशार असो वा मठठ,ग्रामीण असो वा शहरी संशोधनविषयक नमुन्यामध्ये निवड होत असताना त्याला समान संधीचा हक्क असतो.काहीं संशोधनामध्ये उद्दिष्ट आणि चल घटकांनुसार विशिष्ट नमुन्याचीच आवश्यकता असते अशा वेळीही त्या विशिष्ट नमुन्यातील पत्येक प्रतिसादकास समान संधीचा हक्क असतो

**४..गोपनियतेचे संरक्षण** (Protecting Privay)

प्रतिसादकाचे स्वत:चे खाजगी आयुष्य असते.स्वत:च्या आवडी निवडी,मते,विचार,स्वत:ची कौटूंबिक पार्श्वभूमी असते.स्वत:च्या खाजगी गोष्टी,घटना,प्रसंग उघड न करण्याचा हक्क प्रतिसादकाचा असतो.

**५.व्यक्तिगत आदर** (Maintaining Self Respect)

एक व्यक्ती म्हणून किंवा संशोधण प्रक्रियेतील एक महत्वाचा घटक म्हणून प्रतिसादकाचा व्यक्तिगत आदर करणे संशोधकास बंधनकारक असते.प्रतिसादक जर तज्ज्ञ व्यक्ती असेल तर संशोधनासाठी

माहिती संकलनासंदर्भात विनंती पत्र, आभाराचे पत्र,नम्रता,आदरार्थी भाषा यांच्या माध्यमातून प्रतिसादकाचा योग्य तो व्यक्तिगत आदर करावा लागतो.प्रतिसादक कुणीही असो त्याने दिलेली माहिती संशोधन निष्कर्षासाठी अत्यंत महत्वाची अशीच असते भलेही ते निष्कर्ष नकारात्मक असोत.निष्कर्षाचे श्रेय प्रतिसादकास देऊन व्यक्तिगत आदर करणे संशोधकास बंधनकारक असते.

### ६.निष्कर्षाची माहिती जाणणे (Delivery of promises/Knowledge of Outcome)

संशोधन कार्यातून आलेले निष्कर्षहे प्रतिसादकाशी संबंधित असल्याने आलेले निष्कर्ष जाणण्याचा हक्क प्रतिसादकास असतो.प्रतिसादकापासून मिळवलेल्या माहितीचा निष्कर्षाप्रत जाण्यापर्यंत किती प्रमणात उपयोग झाला हे हाणून घेण्याचा हक्क प्रतिसादश्कास असतो.

### ७.ताण,इजा,धोका यापासून संरक्षण (Protection from Stress,Harm and Danger)

संशोधनात प्रायोगिक मात्राा किंवा उपचारापासून प्रतिसादकास मानसिक ताण,शारीरिक इजा किंवा संभाव्य धोके जाणवत बसतील तर त्यापासून संरक्षणाची हमी संशोधकास द्यावी लागते.त्याची पूर्ण जाणीव प्रतिसादकांना देऊन त्यांच्या पूर्वपरवानगीनेच प्रयोग राबवावा लागतो.

### ८.गोपनीयता व विश्वासनीयता (Confidentiality)

प्रतिसादक म्हणून एखादी व्यक्ती किंवा संस्थेकडून प्राप्त केलेली माहिती केवळ संशोधन कार्यासाठीच वापरण्यात येईल त्या माहितीचा कोणत्याही कारणासाठी वापर करण्यात येणार नाही याची हमी संशोधकाला द्यावी लागते. प्रतिसादकाला दिलेल्या या विश्वासाचा आणि गोपनियतेचा भंग होणार नाश्ही याची दक्षता घ्यावी लागते. याउलट एखाद्या घटनेबद्दल जनतेकडून मते मागवली असतील तर त्या माहितीबद्दल गोपनीयता व विश्वसनीयतेचे पालन केलेच पाकिहजे असेही नसते कारण माहिती जनतेकडूनच मिळाल्याने ती गोपनीय नसते. संशोधनामध्ये प्रतिसादकास असलेल्या हक्कांचे महत्व संशोधन कार्यात प्रतिसादकास असलेल्या हक्कांचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येते.

१. प्रतिसादकाच्या स्व निर्णयामुळे माहिती संकलनामध्ये चुकीचा प्रतिसाद मिळत नाही.
२. नमुना निवडीवेळी सर्वच स्तरांवर समान संधी,यादृच्छिकता अशी तत्वे पाळल्याने नमुना त्रूटी कमीत कमी राहते. परिणामी संशोधनातील व्यक्तिनिष्ठता कमी होऊन निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ बनतात.

३. गोपनीयतेचे संरक्षण झाल्याने प्रतिसादकांचे खाजगी आयुष्य अबाधित राहते त्यामुळे प्रतिसादाचे प्रमाण वाढते.

४. प्रतिसादकांना व्यक्तिगत आदर मिळाल्याने ते स्वत:ची जबाबदारी आळखून प्रामाणिकपणे संशोधन कार्यात सहभागी होतात.

५. प्रतिसादकांना निष्कर्षाची माहिती मिळाल्याने संशोधनाचे उतरदायित्व सिध्द होते आणि संशोधन प्रक्रिया अधिकअधिक सामाकिज बनते.

६. प्रतिसादकांना ताण,इजा,धोका यापासून संरक्षण मिळत असल्याने अनैतिक संशोधकीय आचरणास आळा बसतो.

७. प्राप्त माहितीचा वापर केवळ संशोधन कार्यासाठीच वापरण्याची हमी मिळत असल्याने प्रतिसादकांची माहिती अधिक गोपनिय ठेवण्याचा प्रयत्न होतो.त्यामुळे संशोधनाच्या नीतिशास्त्राचेही पालन होते.

८. संशोधनात नाविन्यता आणताना प्रतिसादकांच्या हक्कांचा होणारा भंग

संशोधनाचे वेगळेपण जपताना प्रत्येक वेळी प्रतिसादकांच्या हक्कांचा विचार होतोच असे नाही. पुढील बाबतीत संशोधकाकडून प्रतिसादकांच्या हक्कांचा भंग होऊ शकतो.

१. संशोधन पदवीसाठी ठराविक स्थळ,काळ,वेळेची बंधने घातलेली असल्यास संशोधनासाठीची माहिती बहुधा,अंशत: किंवा पूर्णत: जबकरीने मिळवली जाते.

२. काही संशोधनात प्रतिसादकाची संमती न घेता तसेच संशोधन कार्याची पूर्ण माहती न देताच वैवाकिहक जीवन,धार्मिक श्रध्दा,वैयक्तिक मते, ठराविक समाजाचे राहणीमान व दृष्टिकोण यांची माहिती सहभागी निरीक्षण,सखोल मुलाखत,छूपी चाचणी याव्दारे घेतली जाते.असा व्यवहार म्हणजे व्यक्तिगत स्वातंत्र्यावर हल्ला होय.

३. काही संशोधनातप्रयोगाचे वेगळेपण म्हणून प्रतिादकांना जाणीवपूर्वक मानसिक व शारीरिक ताण देऊन त्यांच्या नैसर्गिक प्रतिक्रियांचा अभ्यास केला जातो.प्रतिसादकांची रीतसर पूर्वपरवाश्नगी घेतली जातेच असे नाही. असा व्यवहार अनैतिक समजला जातो.

४. प्रतिसादकांची गुणात्मक माहिती मिळवताना प्रतिसादकांच्या हक्कांचा भंग होऊ शकतो.

५. प्रतिसादश्श जास्तीत जास्त व त्वरीत मिळावा यासाठी कांही संशोधनामध्ये बक्षिस किंवा इतर वस्तूंचे आमिष दाखवले जाते.चुकीच्या व दिशाभूल करणा—या आमिषांमुळे प्रतिसादकांवर अघोषित सक्ती लादली जाते त्यामुळे स्व निर्णयाच्या हक्काचा भंग होतो.

६. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करताना प्रतिसादकांचा व्यक्तिगत उल्लेख करणे भाग असल्यास गोपनियतेचा भंग होतो.काल्पनियक नांवे जरी धारण करण्याची प्रथा असली तरी देखील एखाद्या समूहाची किंवा संस्थेची नांवे अप्रत्यक्षपणे उघड होतात.काही

४

संशोधनामध्ये तज्ज्ञ व्यक्ती म्हणून प्रतिसादकांचा श्रेयनामोल्लेख कराचे राहिल्यास व्यक्तिगत आदर करण्याच्या हक्काचा भंग होऊ शकतो.

## संशोधनात नाविन्यता आणताना प्रतिसादकांच्या हक्कांचा भंग होऊ नये म्हणून उपाय

संशोधनात नाविन्यता आणताना प्रतिसादांकांच्या हक्कांचा भंग हाऊ नये म्हणून पुढील उपायांची अंमलबजावणी केल्यास संशोधन अधिक वैद्य,विश्वसनीय आणि नैतिक होते.

१. विद्यापीठ पातळीवर प्रतिसाश्श्दकांच्या हक्कासंबंधीची संशोधन आचारसंहिता तयार करणे.
२. मार्गदर्शकाचे ज्ञान अद्यावत असावे.ज्या बाबतीत संशोधक कमी पडेल तेथे मार्गदर्शकास हस्तक्षेप करता यावा.
३. संशोधन पदवी देत असलेल्या शाखेमध्ये संशोधनातील नीकितशास्त्र या घकांचा समावेश असावा.
४. संशोधनासाठी योग्य नमुना निवडावा.प्रायोगिक मात्रेचे वाटप समान असावे.नमुना निवडीत पूर्वग्रहदूषितता नसावीकृ
५. प्रतिसादकांच्या वेळेची कदर करावी.त्यांना आर्थिक भार देऊ नये..
६. प्रतिसादकांना त्यांच्या प्रतिसादाबद्दल प्रत्याभरण द्यावे. स्मरणपत्रिका पाठवाव्यात.
७. प्रतिसादकांच्या भौतिक व सामाजिक कल्याणासाठी वैयक्तिक माहिती,अभिरूची ही गोपनीय ठेवावी. खाजगी आयुष्यावर हल्ला करणारे प्रश्न टाळावेत.
८. संशोधन अहवालात निष्कर्षाचा व्यक्तिनुरूप उल्लेख करू यनयये.त्याचा उल्लेख गट सांख्यिकीच्या स्वरूपात करावा.
९. प्रतिसादकांना शारीरिक,मानसिक,बौध्दिक ताण,इजा,धोका निर्माण होईल अशा कृती टाळाव्यात. त्यासंदर्भात त्यांची अधिकृत लेखी पूर्वपरवानगी घ्यावी.
१० संशोधन अहवालातील माहितीच्या सत्यतेची इंटरनेटच्या मदतीने पडताळणी व्हावी.
११ प्रतिसादकांचा माहितीवर हक्क असल्याने त्यांना संशोधन निष्कर्षाची पूर्ण माहिती द्यावी समारोप

संशोधकाला प्रतिसादकांच्या हक्कांविषयी परिपूर्ण माहिती असेल तरच त्याचे उपयोजन तो आपल्या संशेधनात सहजपणे करू शकेल.शैक्षणिक संशोधनामध्ये मानवी घटकांवर संशोधन होत असल्याने संशोधनाची नाविन्यता म्हणून गुणात्मक संशोधन करताना प्रतिसादकांच्या हक्कांचे पूर्णपणे संरक्षण केले गेल्यास संशोधनातील अनैतिक आचरण थांबेल आणि संशोधन प्रक्रिया अधिक विश्वासार्ह बनेल.

## संदर्भ

अतार, श.न. (२००९), संशोधनातील प्रतिवादी (विषय) संबंधितहक्क :एम.फील.परिसंवाद,शिक्षणशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

घाटोळे,रा.ना.(२००७),समाजशास्त्रातील संशोधन:तत्वे व पध्दती,पुणे:श्रीमंगल प्रकाशन.

पाटील वा..भा.(२००६),संशोधन पध्दती पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

संत दु.का. (२००७),संशोधन पध्दती,प्रक्रिया,अंतरंग,पुणे:विद्यार्थी गृह प्रकाशन.

Best,J,W.and Kahn,J,V.(2008)Research in Education ( 10th ed),New Delhli. Prentice Hall of India.

Mohan,R.,and Parameswaran,E.G.(2006)Research Methods in Education. Hyderabad: Neelkamal Publilcations.

Samant,D.G.,(1996),The Making of Educational Research, Mumbai: Popular Prakashan

Educational Researcher L(2011),Vol.40,No.3PP. 145-156 from http:/www.er.aera.net.

http:/www.humansubjectslenergy.gov/doe-sssresources/workerbrochure.htm.